# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/ ११७५ /२०१८ पुणे शहर दिनांक २६ /१०/२०१८

पुणे शहरातील समर्थ वाहतुक विभागाचे हद्दीत प्रभाग क्र ४८ मधील अल्पना टॉकीज परिसरामध्ये कल्व्हर्ट (नाल्यावरील पुल) बांधण्याचे काम करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी तेजस्वी सातपुते, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, सदर रस्त्यावरील वाहतुक जड वाहनाकरीता पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे.

सदरचे काम हे दि. २७/१०/२०१८ रोजी पासुन चालु होणार असुन काम पुर्ण होईपर्यंत सदर ठिकाणी वाहतुक कोंडी होवु नये व वाहतुक सुरळित चालण्यासाठी खालील मार्गाने वाहतूक डायव्हर्शन करण्यात येत आहे.

- डुल्या मारुतीकडुन संत कबीर चौकाकडे येणारी वाहतुक डुल्या मारुती चौकाकडुन ताराचंद रुग्णालयामार्गे नाना पेठ पोलीस चौकी चौकापासुन संत कबीर चौक तसेच संत कबीर चौकाकडुन डुल्या मारुती चौकाकडे येणारी एकेरी वाहतुक हलक्या वाहनांसाठी चालु राहणार आहे.
- संत कबीर चौकाकडुन लक्ष्मी रोडकडे जाणा-या पीएमपीएमएल बसेस संत कबीर चौकातुन डायव्हर्ट करुन पॉवर हॉऊस चौक डावीकडे वळुन अपोलो टॉकीज – दारुवाला पुल मार्गे सरळ लक्ष्मी रोडकडे.

तरी वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.